धाराशिव जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांच्या ९९ रिक्त पदांसाठी दिनांक १९/०६/२०२४ ते दिनांक ०४/०७/२०२४ पावेतो कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, धाराशिव येथे मैदानी चाचणी घेण्यात आलेल्या व मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे जाहिरातीमधील रिक्त पदाचे १:१० प्रमाणात लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे गुणांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उमेदवार यांची लेखी परिक्षा **दिनांक १२/०७/२०२४ रोजी ११.०० वाजता रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, विद्यानगर, तांबरी विभाग, धाराशिव** येथे घेण्यात येणार आहे. लेखी परिक्षेसाठी यादीमधील पात्र उमेदवार यांनी लेखी परिक्षेसाठी ०८.०० वाजता उपस्थित रहावे. उशिराने हजर राहणाऱ्या उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी परवानगी दिली जाणार नाही.

पोलीस शिपाई पदाच्या लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवार यांना त्यांचे लेखी परिक्षा प्रवेशपत्र https:policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येईल. उमेदवार यांनी लेखी परीक्षेसाठी हजर राहताना प्रवेशपत्र तसेच मैदानी चाचणी दरम्यान या कार्यालयाकडुन निर्गमीत करण्यात आलेले ओळखपत्र सोबत घेऊन यावे. त्याशिवाय लेखी परिक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवार यांना आवश्यकते प्रमाणे पॅड व काळया शाईचे पेन या कार्यालयाकडुन पुरविले जाणार असल्याने उमेदवार यांनी महाआयटी कडुन देण्यात आलेले लेखी परीक्षा प्रवेशपत्र व या कार्यालयाकडुन मैदानी चाचणी दरम्यान देण्यात आलेले ओळखपत्र वगळता ईतर कोणत्याही स्वरुपाचे कागदपत्रे घेऊन येऊ नये.

लेखी परिक्षेसाठी येताना उमेदवार यांना मोबाईल, स्मार्ट वॉच, गणकयंत्र व ईतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र बाळगण्यास सक्त मनाई आहे. तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार ईतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करत असल्याचे आढळुन आल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

उमेदवार यांना काही शंका असल्यास त्यांनी संपर्क क्रमांक ०२४७२-२२२७००/२२२९०० या क्रमांकावर अथवा या कार्यालयाचे ईमेल sp.osmanabad@mahapolice.gov.in यावर संपर्क साधावा.

ठिकाण :- धाराशिव
दिनांक :- ०९/०७/२०२४

( अतुल वि.कुलकर्णी )
पोलीस अधीक्षक धाराशिव